# देवदयेचे दवबिंदू

(डॉ. रंजन केळकर, पुणे)

रात्री तृप्त झोप यावी, पहाटेच दाराबाहेर पडावे, बागेतल्या लाल गुलाबांच्या पाकळ्यांना बिलगलेल्या दवाचे स्वच्छ गोलाकार थेंब दिसावेत आणि देवदयेच्या कोमल व हळुवार स्पर्शाचा आभास व्हावा. दवात भिजलेल्या गवतावर चार पावले चालावीत, मनाला व शरिराला सुखद शांती मिळावी आणि ईश्वरी करुणेचा गारवा प्रत्ययास यावा. एका नव्या दिवसाची सुरवात ह्याहून सुंदर होऊ शकेल का?

पहाटे दव पडणे ही वातावरणातील अनेक प्रक्रियांपैकी एक आहे. दव आणि पाऊस ह्यांच्यामागच्या भौतिक प्रक्रिया फारशा भिन्न नाहीत. पृथ्वीवरील पाण्याच्या बाष्पीभवनामुळे हवेत बाष्प सतत मिसळले जात असते. पण वातावरणाची बाष्प धारण करण्याची एक विशिष्ट क्षमता असते. जितके उच्च तापमान तितकी ही क्षमता अधिक असते. तापमान खाली उतरले की, ती कमी होते. ढगांचे तापमान कमीच असते आणि त्यांच्यातले बाष्प जेव्हा खूप वाढते तेव्हा हवेतल्या सूक्ष्म कणांभोवती पाण्याचे थेंब बनतात. हे थेंब मोठे झाले की, पाऊस पडतो.

पण दव हे पावसासारखे खाली पडत नाही. रात्रीच्या वेळी जमीन व जमिनीजवळच्या गोष्टी थंड होत जातात आणि त्यांच्या आसपासची हवा पण थंड होत जाते. पहाटेपर्यंत ती इतकी थंड होते की, तिच्यातले बाष्प बाहेर फेकले जाते. फुलांच्या पाकळ्या, पाने, गवत, खिडक्यांच्या काचा, अशा अनेक प्रकारच्या शीत पृष्ठभागांवर बाष्पाचे रूपांतर दवबिंदूंत झालेले आपण पाहतो. निरभ्र आकाश, मंद वारा आणि दमट हवा, असे घटक एकत्र आले तर दव पडण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होते. पण दव पहाटेनंतर फार वेळ टिकत नाही. कारण सूर्य उगवला की, त्याची उष्णता पसरू लागते आणि दवाचे पुन्हा बाष्पीभवन होउन ते वातावरणात विलीन होउन जाते.

जुन्या करारात दवाविषयीचे अनेक उल्लेख आढळतात. सर्वांत पहिला उल्लेख उत्पत्तीत कथन केलेल्या इसहाक, याकोब व एसाव ह्यांच्याविषयीच्या प्रसिद्ध गोष्टीत आलेला आहे. वृद्ध झालेल्या इसहाकाला नीट दिसत नसते व एसावाला याकोब समजून तो त्याला आशीर्वाद देतोः "देव तुला आकाशाचे दहिवर, पृथ्वीवरील सुपीक जमिनी, आणि विपुल धान्य व द्राक्षारस देवो" (उत्पत्ती २७ः२८). पुढे इसहाकाला कळते की, त्याने चूक केली आहे, तेव्हा तो एसावाला म्हणतोः "पाहा, पृथ्वीवरील सुपीक जमिनींपासून दूर, वरून आकाशातील दव पडते तेथून दूर, तुझी वस्ती होईल" (उत्पत्ती २७ः३९). दव हे आशीर्वादासारखे आहे आणि त्याचा अभाव हा शापासारखा आहे, अशी उपमा येथे करण्यात आली आहे.

निर्गम १६ः१३-१४ मध्ये इस्राएली लोकांना पहिला मान्ना कसा मिळाला ह्याचे वर्णन आहे. कल्पना करा की, हे लोक त्यांच्या परिस्थितीविषयी कुरकुर करीत व मोशेला दोष देत रात्री झोपी गेले आहेत. आणि पहाटेच ते उठतात तेव्हा त्यांच्या सभोवती दवाची चादर पसरलेली असते. ती पाहून ते किती आश्चर्यचकित झाले असावेत! हे दव सुकून जाते आणि नंतर त्यांना मान्ना मिळतो. अशा प्रकारे रोज रात्री इस्राएली लोकांच्या छावणीसभोवती दव पडायचे आणि नंतर त्यावर मान्ना पडायचा (गणना ११ः९). भौतिक दृष्टिकोणातून पाहिले तर हे दव जमीन ओली करण्याचे काम करीत असावे, नाहीतर मान्नाच्या भाकरी उचलताना कोरड्या मातीचे व वाळूचे कण त्यांना चिकटले असते. पण, लोक कितीही कुरकुर करीत असले व रडगाणी गात असले, तरी परमेश्वर त्याच्या लोकांना कधीही एकटे सोडणार नाही असे आश्वासन जणू काही हे स्वर्गातून पडलेले दव दर रोज देत असावे.

इस्राएली लोकांचे नेतृत्व करणारा मोशे जेव्हा त्यांना अखेरचा निरोप देतो, तेव्हा तो म्हणतोः "हे आकाशा, लक्ष दे, पर्जन्याप्रमाणे माझ्या बोधाची वृष्टी होवो, माझे भाषण दहिवराप्रमाणे ठिबको" (अनुवाद ३२ः१-२). पुन्हा याकोबाच्या घराण्यावर आशीर्वाद मागताना मोशे आकाशातल्या अमुल्य वस्तू, दहिवर, आणि खाली पसरलेले जलाशय ह्यांचा विशेष उल्लेख करतो (अनुवाद ३३ः१३). शेवटी पुन्हा एकदा तो इस्राएलाविषयी म्हणतोः "त्याच्यावरचे आकाश दहिवर वर्षते" (अनुवाद ३३ः२८).

दवाविषयी एक विलक्षण गोष्ट जुन्या करारात सांगितलेली आहे (शास्ते ६). इस्त्राएली लोकांनी परमेश्वराच्या दृष्टीने वाईट कामे केली, तेव्हा परमेश्वराने त्यांना सात वर्षे मिद्यानाच्या स्वाधीन केले. त्यांना इतका छळ सोसावा लागला की, त्यांनी पुन्हा परमेश्वराचा धावा केला आणि त्याने तो ऐकला. परमेश्वराने त्यांची मिद्यानी लोकांपासून सुटका करण्यासाठी गिदोन नावाच्या एका सामान्य तरुणाची निवड केली. आपल्या हातून एवढे मोठे काम होईल असा गिदोनला आत्मविश्वास वाटत नव्हता. म्हणून त्याने देवाकडून एक चिन्ह मागितले. त्याने एका खळ्यात कातरलेली लोकर ठेवली आणि देवाला म्हटले की, रात्री फक्त तिच्यावर दव पडू दे व बाकीची जमीन कोरडी राहू दे. तसेच घडले व पहाटे त्याने ती लोकर पिळली तेव्हा तिच्यातून एक वाटीभर पाणी निघाले, पण आसपासची सगळी जमीन कोरडी राहिली होती. तरी गिदोनाचे समाधान झाले नाही. तो देवाला म्हणाला की, आता ह्याच्या उलट करून दाखव. देवाने तसे करून दाखवले व दुसऱ्या दिवशी सकाळी गिदोनाने पाहिले तो जमीन दवाने भरलेली होती पण लोकर मात्र कोरडी होती (शास्ते ६ः३६-४०). मला असे वाटते की, परमेश्वराला हे दाखवायचे होते की, आपली दया व करुणा कोणावर प्रकट करायची हे सर्वस्वी त्याच्या इच्छेवर आहे. परमेश्वराने मोशेला असेच म्हटले होतेः “ज्याच्यावर दया करावीशी वाटेल त्याच्यावर मी दया करीन” (निर्गम ३३ः१९). तेव्हा कोणीही देवाची दया मिळणे हा आपला हक्क आहे असे मानू नये.

ईयोबाच्या कथेत आपण वाचतो की, ईयोब त्याच्यावर ओढवलेल्या आपत्तींबाबत देवाकडून स्पष्टीकरण मागतो, आणि शेवटी देव स्वतः त्याच्याशी बोलतोसुद्धा. पण देव त्याच्या प्रश्नांचे उत्तर देण्याऐवजी त्यालाच एकामागून एक प्रश्न विचारत जातो. देव ईयोबाला विचारतोः “पर्जन्यास कोणी पिता आहे काय, दहिवरबिंदूंस कोण जन्म देतो?” तात्पर्य हे की, निसर्गात सतत घडत राहणाऱ्या बारीकसारीक व अतिसामान्य गोष्टीदेखील परमेश्वराच्या संमतीशिवाय घडत नसतात. मग त्यांत छोटे, कोणाला त्रासदायक नसलेले, कोमल, नाजुक असे दवबिंदूही आले. परंतु हे सूक्ष्म दवबिंदूसुद्धा परमेश्वराच्या दयेचे प्रतीक आहेत हे ईयोब जाणतो. कारण एकदा आपल्या पूर्वीच्या सुखाची आठवण करताना तो कल्पना करतोः “माझे मूळ पाण्याजवळ पसरेल, माझ्या फांदीवर रात्रभर दहिवर राहील” (ईयोब २९ः१९).

दुसऱ्या एका संदर्भात, यरुशलेमच्या जीर्णोद्धाराविषयी बोलताना, परमेश्वर स्वतः म्हणतोः "भूमी आपला उपज देईल, आणि आकाश आपले दहिवर देईल" (जखऱ्या ८:१२). बेथलेहेमातून येणाऱ्या उद्धारकर्त्याविषयी, मीखा संदेष्टा म्हणतोः "परमेश्वरापासून दहिवर येते" (मीखा ५:७). परमेश्वर आणखी एका ठिकाणी म्हणतोः "मी इस्राएलास दहिवरासारखा होईन" (होशेय १४:५). आणि ह्याविरुद्ध, परमेश्वराने दव पडू दिले नाही तर ते त्याच्या दयेपासून वंचित होण्यासारखे आहे. परमेश्वराचा दोषारोप ऐकाः "म्हणून तुम्हांमुळे आकाशाने दहिवर आवरून धरले आहे, भूमीने आपला उपज आवरून धरला आहे" (हग्गय १:१०).

दवबिंदूंचे अस्तित्व अल्पकाळ असते. रात्रीच्या गारव्यात ते टिकते पण सूर्योदय झाला की, ह्या कोमल बिंदूंचे बाष्पीभवन होते आणि त्यांचा अंत होतो. ह्याची जाणीव संदेष्ट्यांना होतीः "तुमचे चांगुलपण सकाळच्या अभ्राप्रमाणे, लवकर उडून जाणाऱ्या दहिवराप्रमाणे आहे" (होशेय ६:४). मूर्तिपूजकांविषयी होशेय असेच पुढे म्हणतोः "ते सकाळच्या अभ्रासारखे, लवकर उडून जाणाऱ्या दहिवरासारखे होतील" (होशेय १३:३). नीतिसूत्रांतदेखील दवाचा उल्लेख आढळतोः "राजाचा कोप सिंहाच्या गर्जनेसारखा आहे, त्याची प्रसन्नता गवतावर पडलेल्या दहिवरासारखी आहे" (नीतिसूत्र १९:१२).

मग ह्या छोट्या, स्वच्छ, सुंदर, कोमल दवबिंदूंपासून आपण काय शिकायचे? एक तर सृष्टीतील प्रत्येक गोष्टीला देवाच्या योजनेत एक महत्वाचे स्थान आहे आणि कोणत्याही गोष्टीला आपण तुच्छ मानू नये. दुसरे हे की, दवासारख्या अल्पकाळ टिकणाऱ्या एका थेंबातदेखील देवाची दया भरलेली आहे. देवाची दया सर्वत्र आहे. तिचा अनुभव घेणे आपल्या हाती आहे.